## स्थानिक कार्यक्रम

■ कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) नाशिक यांच्यातर्फे भारतरत्न डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या जन्म दिवस व शाश्वत शेती दिवस यानिमित्त शाश्वत शेती कार्यशाळा
स्थळ : बनकर फार्म, दिंडोरी, ता. दिंडोरी

## थोडक्यात

### अनिरुध्द कुलकर्णी पी.एचडीसाठी अमेरिकेत

**नाशिक ।** इंदिरानगर येथील अनिरुध्द कुलकर्णी या विद्यार्थ्याने वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी, सेंट लुई येथे अधिष्ठाता विशेष निवड श्रेणीतून रसायन तंत्रज्ञान विषयासाठी पी. एचडी प्रवेश निश्चित केला.



या काळात अनिरुध्दला १०० टक्के स्कॉलरशिपसह छात्रवृत्ती मिळणार आहे.रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई (इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई) या विद्यापीठाच्या भुवनेश्वर कॅम्पसमधून पाच वर्षाची एम. टेक. डिग्री करत असतानाच अनिरुध्दने उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील विद्यापीठांना अर्ज केला होता. यासाठी त्याला विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.पंडित , प्रा.डॉ. पिंजारी यांचे मार्गदर्शन मिळाले.कुलकर्णी यांनी पी.एचडी. शिक्षणाच्या संशोधनात भारतातील नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी तसेच उपचारांसाठी संशोधन करण्याचा निश्चय व्यक्त केला आहे.

# नाशिक बनणार कुशल कामगार निर्मितीचे हब

■ नाशिक । प्रतिनिधी

टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स आणि नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकला जागतिक दर्जाचे कुशल कामगार निर्मितीचे केंद्र बनविण्याचा निर्धार करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये नवीन प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या बैठकीचे अध्यक्षस्थानी निमा अध्यक्ष आशिष नहार होते.याअंतर्गत नाशिकमध्ये प्रगत उत्पादन तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येणार असून, रोबोटिक्स,



सीएनसी मायलिंग आणि टर्निंग अशा अत्याधुनिक विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तांत्रिक व अतांत्रिक क्षेत्रात प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे.

टाटा आयआयएसचे अधिकारी एस. जगन्नाथन आणि प्रकल्प व्यवस्थापक श्रेयस पाटकर यांनी मुंबई व अहमदाबाद येथे चालणाऱ्या अभ्यासक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या यंत्रसामग्रीवर प्रशिक्षण देण्यात येणार असून, नाशिकचे कामगार देशासोबतच जगभरात स्पर्धेसाठी सक्षम होतील. निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी स्थानिक कामगारांना मुंबईऐवजी नाशिकमध्येच अधिकाधिक प्रशिक्षण मिळावे यावर भर दिला. कामगारांच्या कौशल्यवाढीसाठी अपग्रेडेशन कोर्सही राबविण्याचा विचार असल्याचे त्यांनी नमूद केले. लवकरच निमा व टाटा आयआयएसतर्फे संयुक्त प्रशिक्षण सुरू होणार असून, इच्छुकांनी सातपूर किंवा सिन्नर येथील निमा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीसाठी निमा उपाध्यक्ष के. एल. राठी, सचिव राजेंद्र अहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे, मनिष रावल, सचिन कंकरेज, सुधीर बडगुजर, मिलिंद रजपूत, गोविंद बोरसे, नानासाहेब देवरे, अनिल मंत्री यांच्यासह टाटाचे वरिष्ठ अधिकारी मंगेश भूपती, नितीन अवैया, सायली काकडे आदी उपस्थित होते.

## रस्ता स्वच्छ करावा; नागरिकांची मागणी

■ नवीन नाशिक । प्रतिनिधी

पावसामुळे रस्त्यांना खड्डे पडल्याने महापालिकेतर्फे खड्डे बुजविण्यासाठी खडी व कच टाकण्यात आली होती. मात्र आता ही खडी व कच रस्त्यावर पसरल्याने दुचाकीस्वारांच्या अपघाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे. महापालिकेतर्फे अशा ठिकाणांचा शोध घेऊन रस्ते साफ करावे, अशी मागणी नागरिकांनी व वाहनचालकांनी केली आहे.

# गायरान जमिनीवरचा हक्क मिळावा

## शेतमजुरांची मागणी

■ नाशिक । प्रतिनिधी

महसूल सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर लोकमोर्चा गावरान हक्क अभियानच्या वतीने म्हसरुळ परिसरातील शाहूनगर म्हसोबावाडी (सर्व्हे नं. २५९) येथील भूमिहीन शेतमजुरांना गायरान जमिनीवरचा मालकी हक्क मिळावा, या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १ जानेवारी २०११ पूर्वी गायरान जमिनीवर घरे बांधून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना ५०० फूट जमीन मालकी हक्काने देण्याचे धोरण जाहीर केले आहे. या घोषणेला अनुसरून शाहूनगर म्हसोबावाडी परिसरात अनेक भूमिहीन शेतमजूर आपल्या कुटुंबांसह गेल्या अनेक वर्षांपासून झोपडपट्टी स्वरूपात राहत आहेत. मात्र, त्यांच्या नावावर कोणतीही जमीन नसल्यामुळे त्यांना पंतप्रधान घरकुल योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकुल योजनेचा लाभ मिळत नाही.

या पार्श्वभूमीवर महसूल सप्ताहात संबंधित तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांना या जागेचे सर्वेक्षण करून पुढील कार्यवाही सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर लोकमोर्चा गावरान हक्क अभियानाचे अध्यक्ष सुभाष नारायणराव मुंढे, विजय पोटीदे, संजय खरात आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शहर-जिल्ह्यातून दोघे तडीपार

**नाशिक ।** आयुक्तालय हद्दीतून रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई सुरु झाली आहे. त्यानुसार अंबड आणि देवळाली कॅम्प हद्दीतील दोन सराईत गुन्हेगारांना एका वर्षासाठी शहर-जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.

ऋतिक उर्फ गजाळ्या वसंत रक्ताटे (२३, रा. नम्रता चौक, पाटीलनगर, सिडको), भीमराव उर्फ लखन सुधाकर डांगळे (४०, रा. जुने स्टेशनवाडी, देवळाली कॅम्प) असे तडीपार करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगारांचे नाव आहे. अंबड हद्दीतील सराईत रक्ताटे याच्याविरोधात शस्त्राचा धाक दाखवून मारहाण, गंभीर दुखापत, घरात घुसून जीवे मारण्याची धमकी देणे, मालमत्तेचे नुकसान करणे, मनाई आदेशाचे उल्लंघन आदी स्वरुपाचे चार गुन्हे दाखल आहेत. तर, देवळाली कॅम्प हद्दीतील सराईत डांगळे याच्याविरोधात बेकायदेशीर जमाव करून हत्याराचा धाक दाखविणे, दमदाटी करून मारहाण करणे, गंभीर दुखापत, मनाई आदेशाचे उल्लंघन, अवैध दारुविक्री करणे यासारखे गंभीर स्वरुपाचे तीन गुन्हे दाखल आहेत. उपायुक्त किशोर काळे यांच्या आदेशान्वये सराईत गुन्हेगार रक्ताटे यास दोन वर्षांसाठी तर डांगळे यास एका वर्षासाठी शहर-जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.

## वृक्षांची छाटणी करा

**नवीन नाशिक ।** मुंबई आग्रा महामार्गालगत असलेल्या सर्विस रोड लगत असलेली सुशोभीकरणाच्या झाडांची प्रशासनातर्फे छाटणी करण्यात येत आहे. पावसामुळे सदरहू झाडे अनावश्यक वाढली होती त्यामुळे याठिकाणी छाटणी करण्याचे काम सुरु आहे.

# ...अखेर खड्डे बुजवले






■ नवीन नाशिक । प्रतिनिधी




छत्रपती शिवाजी महाराज सेंट्रल पार्क समोरील रस्त्यावर मोठ्याप्रमाणावर खड्डे पडले होते. याबाबत दैनिक 'देशदूत'मध्ये वृत्त प्रसिद्ध होताच महापालिका प्रशासनाने याठिकाणचे खड्डे बुजवायला सुरुवात केली. यामुळे वाहनचालकांनी तसेच परिसरातील नागरिकांनी 'देशदूत'चे आभार मानले.

छत्रपती शिवाजी महाराज सेंट्रल पार्क समोरील मुख्य रस्ता हा महामार्गाला तसेच गणेश चौक व स्टेट बँक चौक येथे जाणारा मुख्य रस्ता असल्याने याठिकाणी वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरूच असते. याठिकाणी मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्याने ते न बुजविल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष संतोष भुजबळ यांनी महापालिका विभागीय अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला होता. महापालिकेने या वृत्ताची दखल घेत या ठिकाणचे खड्डे बुजविण्यात आले.

## जेडीसी बिटकोत विद्यार्थी प्रतिनिधी शपथविधी

**नाशिकरोड ।** येथील जेडीसी बिटको इंग्लिश मीडियम हायस्कूलमध्ये गृहनिहाय विद्यार्थी प्रतिनिधी निवड आणि शपथविधी पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पवार, प्राध्यापक जयंत भावे, अधीक्षक, नाशिकरोड विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत, मुख्याध्यापक दावल नंदन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. प्रमुख अतिथी सुभाष पवार यांनी शपथ दिली.

# शेतकरी आंदोलन समन्वय समितीचे निवेदन

**नाशिक ।** जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सक्तीच्या कर्जवसुली करू नये, अशी मागणी शेतकरी आंदोलन समन्वय समितीने केली.

नवीन ओटीएस योजना व व्याजदर आम्हाला थकबाकीदार शेतकऱ्यांना मान्य नाही म्हणून संपूर्ण थकबाकीदार शेतकऱ्यांचे व्याज माफ करून मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावे व होणारे व्याज राज्य शासनाने भरावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी अध्यक्ष भगवान बोराडे, कैलास बोरसे, बाळासाहेब बोरस्ते, रमेश बोरस्ते, दिलीप पाटील यांच्यासह आंदोलक शेतकऱ्यांनी नाशिक जिल्हा बँकेचे प्रशासक संतोष बिडवे, सहनिबंधक निकम, जिल्हा उपनिबंधक फयाज मुलानी यांना निवेदन दिले.

# निलंबनाच्या निषेधार्थ लेखणीबंद आंदोलन

■ नाशिक । प्रतिनिधी

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन केल्याच्या निषेधार्थ राज्यभरातील एफडीए अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लेखणीबंद आंदोलन पुकारले.

कोणतीही चौकशी किंवा अंतिम अहवाल न मिळाल्याची स्थिती असताना निलंबन केल्यामुळे ही कारवाई अपमानास्पद असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.

**कारवाईचा निषेध**

मंत्री झिरवाळ यांनी ७ जुलै रोजी विधिमंडळात नाशिकचे सहआयुक्त महेश चौधरी आणि नंदुरबारचे सहायक आयुक्त संदीप देवरे यांच्या निलंबनाचे आदेश दिले. त्याआधी अक्कलकुवा येथील व्यापारी महेश आणि रमेश तंवर यांच्या दुकानावर अप्रमाणित खाद्यतेल साठा आढळल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

**कारवाईची पार्श्वभूमी**

१० मार्च २०२५ : नंदुरबारचे अन्न सुरक्षा अधिकारी आ.भा. पवार यांनी तंवर बंधूंच्या दुकानावर छापा टाकला.

११ मार्च : रिफाइंड सोयाबीन आणि शेंगदाणा तेलाचे नमुने छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले गेले.

९ मे : अहवालात नमुने अप्रमाणित असल्याचे नमूद.

४ जून : संबंधित व्यापाऱ्याने या निष्कर्षाविरोधात अपील दाखल केले. नमुने फेरतपासणीसाठी म्हैसूर येथील सेंट्रल फूड टेक्नॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूटकडे पाठवले गेले.

**कर्मचारी संघटनांचा आक्रोश**

म्हैसूर प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल अद्याप प्राप्त न झालेला असताना, कारवाई करणे अन्यायकारक असल्याचे सांगत कर्मचारी संघटनांनी लेखणीबंद आंदोलन केले. सर्व संघटना एकवटत असून, निलंबन आदेश मागे न घेतल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राज्य संघटनेने दिला आहे.

## लाखांचा ऐवज लंपास

**नाशिक ।** चुंचाळे शिवारातील घरकुल योजनेतील बंद घराचे सेफ्टी दरवाजाचे लॉक तोडून चोरट्यांनी लाखांचा ऐवज चोरून नेत घरफोडी केली. सोनू कृष्णदेव सिंग (३३) यांच्या फिर्यादीनुसार, सोमवारी (दि.४) मध्यरात्री चोरट्याने लॅचलॉक तोडून १ लाख ७ हजार ७८५ रुपयांचा ऐवज चोरून नेला. अंबड पोलिसात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

## प्रशांतनगरमध्ये घरफोडी

**नाशिक ।** पाथर्डी फाटा परिसरातील प्रशांतनगरमध्ये बंद फ्लॅटचा कडीकोयंडा तोडून ८० हजारांचा ऐवज चोरून नेत घरफोडी केली. इंदू गणपत शार्दुल (५५, रा. गोमती अपार्टमेंट, प्रशांतनगर) यांच्या फिर्यादीनुसार, ३१ जुलै रोजी दुपारी ३ ते रात्री १० या दरम्यान बाहेर गेले असता चोरट्यांनी रोकडसह दागिने असा १ लाख पाच हजारांचा ऐवज चोरून नेला केली. इंदिरानगर पोलिसात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

## पान १ वरुन...

### खड्डेमुक्त आगारांची घोषणा हवेत विरली?

खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे, ज्यामुळे प्रवाशांसह एसटी कर्मचाऱ्यांनाही आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

खराब रस्त्यांमुळे प्रवाशांना शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. धक्के खात प्रवास करणे, खड्ड्यांतून वाट काढताना होणारी गैरसोय यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. तसेच आगार परिसरात साचलेल्या पाण्यातून काम करताना यांत्रिकी कर्मचाऱ्यांची मोठी कुचंबणा होत आहे. चालकांनाही गाड्या पार्किंग करताना अडचणी येत आहेत.

### ठाकरे-पवार भेट, आघाडीला बळ

शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे हे सर्वजण उद्या आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून आघाडीला पुन्हा एकदा उभारी देण्यासाठी उद्धव ठाकरेंनी स्वतः पुढाकार घेतला आहे. या दौऱ्यामध्ये उद्धव ठाकरे राहुल गांधी यांच्या निवासस्थानी स्नेहभोजनालादेखील उपस्थित राहणार आहेत.

## कालचे कांदा भाव

| | आवक (क्विं.) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|---|
| पिंपळगाव | २०५०० | ७५० | २०६० | १३२५ |
| विंचूर | १५४२२ | ५०० | १३५२ | १२८० |
| निफाड | ८१०० | ५०० | १३८० | १२८० |
| सायखेडा | ५२१० | ८७१ | १५०० | १२७५ |

## फळभाज्यांचे प्रती जाळी दर

| फळभाजी | कमी | जास्त | सरासरी |
|---|---|---|---|
| टमाटा | ३५० | ९०० | ५५० |
| वांगी | २०० | ४०० | २५० |
| फ्लॉवर | ८० | १५० | १२० |
| कोबी | ५० | १०० | ७० |
| ढोबळी | ३०० | ४०० | ३०० |
| भोपळा | १५० | ३५० | २५० |
| कारले | ३०० | ५०० | ४५० |
| दोडका | ३५० | ६०० | ५०० |
| गिलके | २५० | ४०० | ३९० |
| भेंडी | १५० | ३०० | १५० |
| काकडी | ३०० | ६०० | ५०० |


# क्लासिफाईड /सुपरमार्केट

## पाहिजेत

**अनुभवी** ऑफिस अकाऊंटंट आणि टेलीकॉलर पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर. मो.8983101066, 9970630713. (06/08-BK-3493)

## भाड्याने देणे

**आयुष** एम्पायर कर्मयोगी नगर, सिटी सेंटर मॉलच्या ५ मिनिटाच्या अंतरावर सेकंड फ्लोअर सेमी फर्निश्ड ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे. मो. 9823093405. (08/08)

## दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00555)

## व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26) (CRINV-23-24JL CRG00554)

## सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26) (CRINV-23-24JL/ CRG00556)

## वाहन विषयक




## नावात बदल

**माझे** जुने नाव सदानंद बंडू नवले असे होते. आता माझे नवीन नाव सदानंद बंडोपंत नवले असे झाले आहे. आधार नं. 2829 0485 2623. (BK-3749)

**माझे** जुने नाव संजीव लक्ष्मण घोलप होते. आजपासून माझे नवीन नाव संजीव लक्ष्मनराव घोलप असे आहे. (BK-3748)

MY OLD NAME WAS MAYURKUMAR SHANTILAL CHHORIYA HAS BEEN CHANGED TO MY NEW NAME MAYOOR SHANTILAL CHORRIYA AS PER AADHAR CARD. (BK-3748)

My Old name was Sayali Pramod Shirolkar which has been changed to New name Sayali Abhishek Pathak as per Aadhar Card No. 9554 8416 2111. (BK-3750)

My old name was Junaid Hussain Akabar Pinjari has been changed to my new Junaid Hussain Akbar Pinjari as per Aadhar card No. 7086 4651 5160. (CM-481)

My old name was Tabassumbee Akabar Pinjari has been changed to my new name Tabssum Sardar Pinjari as per Aadhar card No. 7214 8208 4544. (CM-481)

My old name TEJAS KESHAV DAVANGE has been changed to new name TEJAS KESHAV DAWANGE as per Aadhar No. 8651 5676 5085. (CM-484)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.


## वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# हातमागाची जादू ,येवल्याची पैठणी

### राष्ट्रीय हातमाग दिन विशेष

**येवला** हे महाराष्ट्रातील एक शहर आहे, पैठणी साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. पैठणी ही महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध आणि पारंपरिक वस्त्र आहे. येवला शहरात हातमागावर पैठणी साड्या तयार केल्या जातात.त्यामुळे त्यांना देशातच नव्हे परदेशातही मागणी आहे.

येवला शहर आणि तालुका परिसरात सुमारे साडे दहा हजार हातमाग असून या व्यवसायात सुमारे पंधरा ते वीस हजार कारागीर आहेत. सुरुवातीच्या काळात विशिष्ट जाती समाजाचे लोक पैठणी विणकाम व्यवसायात होते मात्र आता सर्व जाती-धर्माचे लोक या व्यवसायात आहेत.

येवल्यातील पैठणी विणकर शांतीलालसा भांडगे यांना संत कबीर हा वस्त्रोद्योगातील सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कारासह राष्ट्रपती पुरस्कार मिळालेला आहे. भांडगे परिवारात शांतीलाल भांडगे यांचेसह राजेश भांडगे, महेश भांडगे, दिगंबर भांडगे असे एकूण पाच राष्ट्रपती पुरस्कार मिळालेले आहेत. याबरोबरच येथील दत्ता हंडी, रमेश परदेशी यांना राष्ट्रीय तर मनोज दिवटे, पंकज पहिलवान, राजू परदेशी यांना राष्ट्रीय पात्रता पुरस्कार मिळालेला आहे.

येवल्यात शासनाने पैठणी पर्यटन केंद्र उभारलेले असून पैठणी क्लस्टर राबविले जात आहे. येवला महाविद्यालयात पैठणी विणकाम संदर्भातील कोर्स चालविला जातो. येथील कापसे उद्योग समूहाने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पैठणी प्रशिक्षण केंद्र सुरू केले असून या दिव्यांगांनी बनवलेली पैठणी हातमाग दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपतींना भेट दिली जाणार आहे.

अंबानी कुटुंबीयांच्या विवाह सोहळ्यात कापसेंकडून पैठणी साड्या गेल्या होत्या तर अयोध्या येथे उभारण्यात आलेल्या राम मंदिरासाठी कापसे यांच्याकडून महावस्त्र पाठवले गेले होते.

केंद्र व राज्य सरकार पैठणी विणकर कारागीरांसाठी विविध योजना राबवत आहेत. गणेश चतुर्थी निमित्ताने उत्सव भत्ता, २०० युनिट वीज मोफत, धागा खरेदीवर १५ टक्के अनुदान याचा समावेश आहे.महाराष्ट्र शासनाच्या व सर्व उद्योग धोरण समितीवर अशासकीय सदस्य म्हणून येथील विणकर मनोज दिवटे यांची नियुक्ती झालेली आहे.

**- योगेंद्र वाघ, येवला**